क्रमांक : ६७

# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग-दोन

### सोमवार, दिनांक ०२ डिसेंबर, २०२४/अग्रहायण पौष, १९४६ (शके)

संदर्भ: पत्रक भाग दोन कमांक ६५, दिनांकित १७ ऑक्टोबर, २०२४.

**७५.** निदेशानुसार सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेच्या ऑक्टोबर, २०२४ मधील सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने लागू केलेली आचारसंहिता विचारात घेऊन, मा.पीठासीन अधिकारी यांच्या निदेशानुसार सर्व सन्माननीय सदस्यांना दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीत राज्यांतर्गत व राज्याबाहेरील प्रवासाकरिता रेल्वे कुपन पुस्तकांचा वापर, राज्य मार्ग परिवहन वा अन्य परिवहन सेवांद्वारे मोफत प्रवास व महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९५६ च्या कलम ५ (१-अ) नुसार विमान प्रवास या सुविधा अनुज्ञेय राहणार नाहीत, असे संदर्भाधीन पत्रक भाग-२ द्वारे कळविण्यात आले होते.

राज्यातील मतदानाची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. त्यानुसार भारत निवडणूक आयोगाने कळविल्यानुसार आचारसंहिता संपुष्टात आली असल्याने उपरोक्त सुविधा आता पूर्ववत अनुज्ञेय राहतील.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : ०२ डिसेंबर, २०२४

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१ (कार्यभार)
महाराष्ट्र विधानपरिषद

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-

(१)महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य
(२)महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष
(३)महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये